# लोकराजा राजर्षी शाहू



संपादक

प्रा.डॉ. डी.टी. घटकार प्रा. जे.एल. जायेवार

Scanned by TapScanner

२९. राजर्षी शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी कार्य .......... २००
प्रा. रमेश आसाराम वाघ

३०. सामाजिक न्यायाचे कालातीत नेतृत्व : राजर्षी शाहू महाराज ....... २०७
डॉ. एन. पी. कुडकेकर

३१. राजर्षी शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी कार्य .......... २१२
प्रा. ससाणे सतीश गंगाराम

३२. राजर्षी शाहु महाराजांचे लोककल्याणकारी कार्य .......... २१८
प्रा.राणी जाधव-गायकवाड, प्रा.राणी जाधव

३३. राजर्षी शाहु महाराज : लोक कल्याणकारी राजा .......... २२६
सहा. प्रा. संगिता गंगाराम उतेकर

३४. राजर्षी शाहू महाराज : बहूजन समाज उद्धारक .......... २३३
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)

३५. राजर्षी शाहू : एक भारतीय समाजशास्त्रज्ञ .......... २३८
सहा.प्रा.सौ. सोमवंशी अल्का बाबाराव

३६. राजर्षी शाहू महाराज यांची ब्राम्हणेत्तर चळवळीतील भूमिका .......... २४७
प्रा. डॉ. बाबासाहेब केशवराव शेप, मुंडे दत्तात्रय रामकिशनराव

३७. राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन .......... २५८
स.प्रा.हंगरगे यशवंत रामराव

३८. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य उध्दाराचे कार्य .......... २६३
प्रा.डॉ.तानाजी लोखंडे

३९. राजर्षी शाहू महाराज आणि धर्मनिरपेक्षता .......... २६८
प्रा.कुडमते विलास देवराव

४०. राजर्षी शाहू महाराज व बहुजन समाज .......... २७३
सहा. प्रा. डॉ. शिंदे अनंत नामदेवराव

४१. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे परिवर्तनवादी विचार व कार्य ...... २७७
प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव

४२. राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मुलन .......... २८५
डॉ. गाजरे विलास अण्णाराव

४३. राजर्षि शाहू महाराजांचे समाजोन्नतीचे तत्त्वज्ञान - एक दृष्टिकोन ...... २९२
प्रा. नरवाडे बालाजी मारोतराव

ISBN 978-93-5240-161-1

# ३३.

# राजर्षी शाहु महाराज : लोक कल्याणकारी राजा

सहा. प्रा. संगिता गंगाराम उतेकर
प्रथपाल
द.ग.तटकरे महाविद्यालय माणगांव
माणगांव – रायगड ९५५२८०३२८७
sangitagutekar@gmail.com

**प्रस्तावना :**

शाहु महाराजांनी आपल्या २८ वर्षाच्या कारकीर्दीत अनेक बहुमोलाचे कार्य केली. त्यांनी सत्ता आणि आधिकारांचा उपयोग संस्थानातील सामान्य जनतेसाठीच केला. जाती संस्थेव्द्वारे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाला आधार दिला. जाती व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्याला विरोध झाला. तेही निर्भयपणे त्यांनी स्वीकारले. शाहू म्हणतात आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकासारखी आभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानाचा सर्व बाजूनी अभ्युदय व्हावा. अशी आमची उत्कट इच्छा आहे. व यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे या वरून महाराजांचे बहुजनप्रती प्रेम आपुलकी याची जाणीव होते. राजर्षी शाहु हे प्रजावत्सल दलितबंधू समतेचे पूरस्कर्ते आणि निधडया छातीने कर्ते समाजसुधारक होते. शाहुनी आपल्या आयुष्यात जातीभेद निर्मूलन, अस्पृशता निवारण, स्त्रियांचा उध्दार, बहुजनांचा शैक्षणिक विकास, औदयोगिक प्रगती, शेतीचा विकास, धरणे, रस्ते, कलेवर प्रेम, मल्लविद्या, मर्दानी खेळ रोजगार, सार्वजनीक कामे प्रशासन विषयक सुधारणा या क्षेत्रात मोलाची कामगीरी बजावली त्यामुळेच शाहु हे लोकाचे राजे झाले.

**आरक्षणाचे प्रणेते :**

मागासलेल्या वर्गाना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्याच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहीले अशी कल्पना महात्मा ज्योतीबा फुले यांनी मांडली.

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner

राजर्षी शाहूंनी आपल्या आधिकारांचा वापर करून ही कल्पना प्रत्यक्षात उतरवली १९०२ मध्ये शाहू महाराज युरोपच्या दौऱ्यावर गेले तेव्हा तेथिल परिस्थिती पाहून ते भारवून गेले. किंग एडवर्ड दूसरा याच्या राज्याभिषेक समारंभाला इंग्लड येथे उपस्थित होते. तेथे त्यांनी कोल्हापूर संस्थानासाठी आरक्षणचा जाहिरनामा पाठविला. या जाहिरनाम्यामध्ये ५० जागा मागासवर्गीयांना राखून ठेवण्यात आल्या होत्या तसेच मागासवर्गीय कोणाला मानवयाचे हे देखील निर्देश सदर जाहिरनाम्यात देण्यात आले होते. ब्राम्हण, प्रभू, शेणावी आणि पारशी या जाती व्यतिरीक्त उर्वरित समाज मागासलेल्या वर्गात समाविष्ट केला होता. संपूर्ण भारत वर्षात त्यावेळी फक्त कोल्हापुर स्टेटचा राजा होता की त्यांनी सर्वप्रथम आपल्या राज्यात ५० आरक्षण लागू केले. मागासांना राजसत्तेतील वाटा मिळालाच पाहिजे अशी महाराजांची भूमिका होती. वंचितांच्या विकासाचे व्रत घेतलेल्या शाहूंनी कशाचीही पर्वा न करता आपले धोरण चालु ठेवले.

**राजर्षी शाहु आणि स्त्रीयांची स्थिती :**

शाहु महाराजांनी स्त्री शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी एक विशेष अधिकारांची जगा निर्माण केली. कु.एच. लिटल यांची त्या जागी नेमणूक केली. त्याच्यानंतर राधाबाई केळकर यांची नेमणूक केली. त्यांनी १८९५ ते १९२२ पर्यंत काम केले. विधवा स्त्रियांच्या जीवनाविषयी विचार करताना राजर्षीचे असे ठाम मते होते की, जर विधवा स्त्री रूढी, परंपराच्या पंजात सापडली तर तीचे जीवन नरकासमान हाईल ती मरेपर्यंत यातना सोसत राहील. तेव्हा तिला मनासारखे जगता आले पाहिजे आणि त्याचबरोबर तिला स्वतःचे सरंक्षण करण्याचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे आणि ते साध्य होण्यासाठी शिक्षण हाच एकमेव रामबाण उपाय आहे. राजर्षींच्या धाकटया सूनबाई विधवा होत्या त्यांच्या विषयीही राजर्षीना असेच वाटेत्र. शिक्षणाचे संस्कार घडल्याशिवाय धाकटया सुनेला चांगले –वाईट योग्य – अयोग्य हे समजण्याची शक्ती साध्य होणार नाही. ज्ञानाच्या सहाय्याने विचारांची कक्ष सहाजिकच कर्तव्याचा वेगवेगळया क्षेत्रात तिला संचार करता येऊन तिचे भकास, उदास जीवन काही अंशाने का होईना सुधारेल म्हणून शिक्षणातुनच स्त्री जीवन सुखी समृध्द करण्याचा निर्नन शाहुंनी घेतला.

''वेळ कधी कशी येईल
सुर्य याचक बनून येईल
आणि एक छोट प्रमाणपत्र
काजव्याजवळ मागून घेईल''

काजव्याची भूमिका निभण्यासाठी शिक्षण उपयोगी आहे असे विचार राजर्षीच्या स्त्री

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner

शिक्षण विषयक कार्यातून प्रकट होतात. आपले जीवन निरर्थक नसून ती एक सामाजिक पूजा आहे. हा सात्विक विचार स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून राजर्षींनी दृढ केला. म्हणूनच राजर्षींना स्त्री शिक्षणाचे खरेखूर कैवारी म्हटले पाहिजे.

**जातिविषयक भूमिका :**

जात व्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या दरोडे अशा चूकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला. त्यांची सर्वच क्षेत्रात अधोगती झाली. सामाजीक क्रांतीशिवाय आर्थिक आणि राजकीय क्रांती होऊ शकत नाही, आणि झालीच तर समाजातील सर्वांना त्याचा लाभ सारख्या प्रमाणात मिळत नाही हे शाहू महाराजांना पक्के माहीत होते म्हणून त्यांनी सरजामशाहीची पाळेमुळे खणून काढली व त्यांच्यावर अंकूश ठेवला व जातीभेद निर्मुलनासाठी त्याच जातीतल्या लोकांनी प्रयत्न करण्यापेक्षा उच्च वर्गीयानी पूढाकार द्यावा असे महाराजांना वाटत होते. समाजामध्ये प्रत्येक जातीत रोटी बेटी व्यवहार व्हावेत असे त्याना मनापासून वाटत होते. जात धर्म न पाळता कुठल्याही जातीतील कुलांनी कुठल्याही जातीतील मुलांशी विवाह करावा व जातीभेद कमी करावा अशा विचारांचे शाहू महाराज होते. आंतर जातीय विवाह कायदेशीर ठरावेत म्हणून व नोंदणी पध्दतीने विवाह करू इच्छिणाऱ्याना तसे कायदेशीर स्वातंत्र देणारा कायदा शाहू महाराजांनी अंमलात आणला. या कायद्यानूसार सर्वांना समप्रमाणात वागणूक मिळावी यासाठी सर्व जातींनी एकत्र यावे किंवहुना जातच समाजामध्ये नसावी यासाठी महाराजांनी आंतरजातीय तोडगा काढला होता.

**आपत्कालीन व्यवस्थापन :**

कोणतही आपत्ती निर्माण झाल्यास त्याचा दुषपरिणाम होतो म्हणून आपत्कालीन व्यवस्थापन करणे आवश्यक आहे हे महाराजांच्या कार्यावरून दिसून येते. इ.स १८८९ – १९०० मध्ये पुन:दुष्काळ पडला तेव्हा स्वतंत्र दुष्काळ निवारण खात्याची निर्मिती केली. दुष्काळामुळे लोकांना काम देणे महत्वाचे आहे हे ओळखून रस्ते, तलाव निर्मिती यासारखी कामे काढली. नव्या विहीरी खोदण्यासाठी शेतक–यांना कर्ज देण्याचा कार्यक्रम आखला. म्हैसूर राज्यातून धान्य मागवले व गावोगावी स्वस्त धान्य दुकाने सुरू केली. १८९६ –९७ मध्ये संस्थानात दुष्काळ व प्लेगची साथ पसरली त्यात गुरढोर मरू लागली. तेव्हा जनतेला महाराजांनी भेटी दिल्या व मानसिक आधार दिला.

**शिक्षणाविषयक धोरण :**

बहुजन समाजातील मागासलेपण दुर करण्याचे शिक्षण हेच महत्वाचे साधन शाहु

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner

महाराजांनी मानले. त्यांचे हे शैक्षणिक कार्य केवळ कोल्हापूर पूरतेच मर्यादीत नव्हते तर पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ते पदासिध्द अध्यक्ष होते. बनारस हिंदु विश्व विद्यालयाच्या निर्मितीसाठी त्यांनी आर्थिक सहकार्य केले. पुणे, अहमदनगर, नाशिक येथील वसतिगृहांच्या स्थापनेला सहकार्य केले. मद्रासचे सामाजीक कार्यकर्ते डॉ. टी. एम. नायर यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती दिली. शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण हे समाजाला समानतेच्या पातळीवर आणणारे होते. मनू आणि त्यांच्या मागून आलेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या धोरणाला अनुसरून निरनिराळया जातीच्या व्यवहारात बंधनकारक असे निबंध रचले आणि आमच्या जातीच्या लोकांना विद्यामंदिरे दरवाजे बंद करण्यात आले. परंपरेने शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या समाजाला शिक्षणाची दारे खूली करून दिली तर उपेक्षित घटक समाजाच्या प्रवाहात येऊन सुखकर जीवन जगेल अशी धारणा महाराजांची होती. मुलं आवडीने शिक्षणाकडे वळत नाहीत याची सतत जाणीव महाराजांना होत होती. म्हणून त्यांनी सक्तीच्या शिक्षणाचे धोरण आखले. शिक्षण हाच आमचा तरणोपाया आहे असे माझे मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाहि असे इतिहास सांगतो. अज्ञानात बडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजाणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिदुस्थानाला अत्यंत आवश्यक आहे. अशी महाराजांची शिक्षणाविषयक विचारसरणी होती. जाहिरनाम्यानूसार कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. शिक्षणासाठी योग्य वय असलेल्या मुलामुलींना शाळेत पाठविण्याबाबत पालक आणि गावकामगार यांच्यावर कडक बंधने घालवण्यात आली. विद्यार्थ्यांना सुतारकाम, गवंडी काम, लोहारकाम, तंत्रशुध्द पध्दतीने करता यावे तसेच कुशल कामगार निर्माण व्हावे या अनुषंगाने जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटयुट ची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण मिळावे यासाठी इन्फंट्री स्कुल ची निमिर्ती करण्यात आली. ग्रामकारभार सुरळीत चालावीता यावा तसेच सामान्य माणसांना ग्रामकारभाराची माहिति व्हावी म्हणून महाराजांनी पाटील स्कुल व तलाठी स्कुल निर्माण करून शाहू महाराजांनी शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या.

**वेदोक्त प्रकरण :**

शाहु महाराजांच्या जीवनाला कलाटणी देणारा सर्वात महत्वाचा प्रसंग म्हणजे वेदोक्त प्रकरण होय. शाहु महाराजांचा भटजी राजोपाध्ये यांनी महाराजांना शुद्र मानून त्यांचे विधी वैदिक मंत्राने न करता पुराणोक्त मंत्राने करणार अशी भूमिका घेतली त्यामूळे महाराज दूखावले गेले. प्रत्यक्ष राजाला नकार देण्याइतपत मजल पुरोहिताची गेली होती

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner

स्वतः मात्र पुरोहित आंघोळ न करता पुजेला बसल्याची उदाहरणे आहेत. शेवटी पुरोहिताने महाराजांचा विधी वेदोक्त मंत्राने न करता पुराणोक्त मंत्रानेच केला व महाराजांना देखील अस्पृश्य ठरविले. वेदोक्त प्रकरणावरून मराठा व क्षत्रियांची अशा प्रकारे दयनिय अवस्था आहे, तर मागासवर्गीयांची आणि बहुजनांची काय अवस्था असेल याची शाहु महाराजांना या वेदोक्त प्रकरणावरून कल्पना आली.

**शाहु महाराजांचे आर्थिक धोरण :** शाहु महाराजांनी उदयोगधंदे उभारण्याच्या दृष्टीने खास प्रयत्न केले कारागिरांना आश्रय दिला. त्यासाठी मोठी आपल्या संस्थानात सुत गिरणी चालु केली जमीन मोफत दिली. इचलकरंजी येथे उदयोगधंदे त्यानंतर इतर ठिकाणी अशा प्रकारचे कारखाने सुरू केले. जिनिंग कारखाना सुरू केला त्यांना राहण्यासाठी आणि व्यापार वाढीसाठी शाहुंनी कारगिरांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या पाणी पुरवठा बिनव्याजी कर्ज दिली जमीनी दिल्या त्यांची मोफत सोय केली. रस्ते बांधले, रेल्वेच्या विकासास गती दिली शहापूर हि व्यापारपेठ वसवण्यात आली.

**औदयोगिक विकास :** जनकल्याणाच्या दृष्टीकोनातून औद्योगिक विकासाचे उदिष्ट त्यांनी ठेवले आणि पूर्ण करण्यासाठी नफेखोर आणि भांडवलदारांच्या लहरीपणावर अंकुश ठेवला. त्यांना आपल्या लहरीनुसार व्यवसाय करून न देता समाजहिताच्या दृष्टीने व्यवसाय करण्यावर भर देण्यास भाग पाडले व व्यापार केंद्राची निर्मिती केली. या केंद्राच्या मार्फत व्यापाऱ्यांनी व्यापार करावा असे आदेश काढले.

**कलेवर प्रेम :** समाज केवळ सामाजिक आर्थिक सुबत्तेवर जगत नाही तर त्याला सांस्कृतीक वारसाही असावा लागतो. त्यातून मानवी जीवनाला परिपूर्णता प्राप्त होते, असे महाराजांना वाटत होते त्यामुळे त्यांनी आपल्या दरबारात संगित नृत्य कलेला राजश्रय दिला. कोल्हापूर संस्थानाला लोकसंगीताची दीर्घ परंपरा आहे. किर्तन, भजन, तमाशा, लावणी, दिंडी वाघ्या मुरळीची गाणी, ठूमरी, गझल इ. कलाप्रकारांना महाराजांनी राजाश्रय दिला.

**प्रशासन विषयक सुधारणा :** कार्यालयीन कामाची नियमावली ठरवली. रजेचे नियम बनविले, दंड आणि शिक्षेचे देखील नियम तयार केले. त्यामुळे कामचुकार कर्मचाऱ्यांवर वचक बसला व जनतेची कामे सुरळीत व्हायला लागली. ब्रिटीशांची महाराजांनी गय केली नाही. परिणामी अशा ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भारतातून पळ काढला. अशा ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या जागी महाराजांनी भारतीयांना नोकऱ्या दिल्या.

**मल्लविद्या आणि मर्दानी खेळ :** आपल्या संस्थानातील नागरीक आरोग्य संपन्न असावा असे महाराजांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी मल्ल तयार करण्यासाठी

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner

विविध मैदानी खेळ संस्थानात सुरू केले. शाहू महाराज स्वत: एक पहेलवान होते व नियमित कुस्तीचा सराव करित असत. महाराज म्हणत, पहेलवान तयार होत नसतात, तर तो तयारा करावा लागतो. पहेलवानांच्या खाण्यापिण्याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे.

**सार्वजनिक कामे आणि रोजगार :**

सर्वांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी महाराज सदोदीत प्रयत्नशील राहिले.

१. ठंग्रजांना विरोध करून संस्थानाला धोका निर्माण करून देण्याऐवजी त्यांच्या सहकार्याने बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीला आपल्या सत्तेचा लाभ करून देणे हा मार्ग त्यांनी स्वीकारला.

२. स्माजातील सामाजीक व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.

३. शेतकऱ्यांना अल्पदाने कर्ज पूरवठा सूरू केला

४. होतकरू गरिब विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे स्थापन केली.

५. शेतजमीनीचे तूकडे होवू नये म्हणून इनाम जमिनीच्या वाटणीस बंदी हा कायदा केला.

६. १९०२ मध्ये मागासांना संस्थानात नोकरीमध्ये ५० राखीव जागा ठेवणारा कायदा करून त्यांची अंमलबजावणी केली.

**राजर्षी शाहुंचा वारसा :** आज शाहू महाराजांचे काम बहुतांशी लोकांपर्यंत पोहचले आहेशाहुराजांच्या या अद्‌वितीय कामगिरीमुळे सर्वसामान्य बहुजनांच्याहदयात शाहुंना आदरावे स्थान आहे. महात्मा फुले आणि पूरोगामी बाबासाहेब आंबेडकर या यूगपूरूषांच्या जोडीला शाहु राजांचे नाव घेतले जाते डॉ. आंबेडकरी विचारांवा फार मोठा वाटा आहे हुशा महाराष्ट्र घडवण्यात फुले आणि शाहू महाराजांच्या जयंत्या पूण्यतिथ्या सर्वत्र साजऱ्या केला जातात परंतु फक्त शाहूंचा लढा हा समतेसाठी होता. कार्याचे चीज होणार नाही एवढे करून त्यांच्या विचार आज शाहू राजांच्या पश्चात प्रवृत्ती विरूध्द होता वर्ण वर्चस्वाच्या अहंकारी आत्मसन्मानासाठी होता त्यांचाच जयजयकार करणारे त्यांच्या नावाने सत्ता भोगणारे राज्यकर्ते गरीब प्रजेला छळत आहेत भ्रष्टाचार, गुंडागीरी या प्रवृत्ती फोफावल्या आहेत. शाहुराजे फक्त पुजण्यापुरतेच राहिले आहेत. त्याचा वारसा त्यांचे विचार कार्य आपण विसरलो आहोत. राजर्षी शाहूंनी प्रतिकुल परिस्थीतीत आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कायदे केले प्रसंगी टीका अपमान, बदनामी यांची पर्वा केली नाही पण आजच्या राज्यकर्त्यांना जादुटोणा व अघोरी प्रथाविरूध्द कायदा करता येत नाही

ISBN 978-93-5240-161-1

नावाने राजकारण करतात मात्र त्यांचा विचार जपताना कुणीच दिसत नाही राज्यकर्ते शाहुंच्या हि दुर्देवाची बाब आहे.

शाहुंच्या कार्याचे खरे चीज व्हावे असे वाटत असेल तर शिक्षण घेवून उच्च पदे हस्तगत केली पहिजेत. आपल्या अधिकार पदाचा वापर सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाकरता केला पाहिजे उपेक्षित वंचितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे जातीभेद नष्ट करणे सामाजिक समता प्रस्थापित करणे ही शाहु राजांची अपुर्ण राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासठी प्रयत्न करूया हीच शाहुराजांना आदरांजली ठरेल.

**सारांश :**

राजर्षी शाहु महाराजांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतल्यानंतर लक्षात येते की, महाराजांना राजर्षी का म्हटले जाते. धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अधिकार व नियमांचा आधार घेऊन त्याला गुलाम बनऊ नये हीच विचार सरणी महाराजांनी पूर्ण जीवनभर जगल्याचे दिसते. दलितांचा उद्धार करायचा असेल तर परंपारेने त्यांच्या वाटयाला आलेली गुलामगीरी नष्ट झाली पाहीजे आणि म्हणूनच महाराजांनी दलित वर्गातील विशिष्ट जातीवर लादलेली हजेरी वेठवरका प्रथा वतनदारी बंद केली आणि वतने दलितांच्या नावे करून त्यांना मालक बनविल. माणूस म्हणून स्वाभीमानाने जगता यावे, शिकता यावे आणि विकासाच्या वाटा खूल्या व्हाव्यात यासाठी शाहू महाराजांनी जे महान ऐतिहासीक कार्य केले त्याची नोंद अर्वाचीन काळातील महाराष्ट्राचा एवढच नव्हे तर भारताचा इतिहास लिहिणाऱ्यांना करावीच लागेल हे नक्की.

**संदर्भ ग्रंथ:**

१. राजर्षी शाहु छत्रपती जीवन व शिक्षण कार्य प्राचार्य रा.तु. भगत, रिया पब्लिकेशन कोल्हापूर २०११

२. शाहू महाराज आणि कायदेकानून : द.रा.बगाडे पदय प्रकाशन कोल्हापूर

३. राजर्षी शाहू एक समाजक्रांतिकारक, धनंजय किर, मुबंई १९७९

४. राजर्षी शाहू महाराज नाईक तु.बा. मेहता पब्लिकेशन पूणे २००५

५. आधूनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास मोरे, दिनेश के.एस पब्लिकेशन पूणे २००६

६. राजर्षी शाहु छत्रपती : जीवन व कार्य पवार जयसिंगराव महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २०१२

७. छत्रपती शाहू महाराज, भा.ला. गोळे, गंधर्ववेद प्रकाशन पूणे २०१०.

❋❋❋

ISBN 978-93-5240-161-1

Scanned by TapScanner